# प्रेसनोट

जळगांव
दि.२७.०३.२०२५

**राजेंद्र रमेश कुळकर्णी,वय ४८ वर्षे,व्यवसाय नोकरी (भुकरमापक), भुमी अभिलेख कार्यालय,रावेर जि.जळगांव यांनी ४,०००/—रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत...**

---

यातील तक्रारदार यांची रावेर तालुक्यातील मस्कावद बुद्रुक येथे गट नंबर ४२२ ही सामाईक शेतजमीन आहे. सदर शेतजमीनीची हद्दकायम मोजणी करण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचे वडीलांचे नावे दि.१०.०१.२०२५ उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, रावेर येथे ऑनलाईन अर्ज करुन, मोजणी करण्यासाठी लागणारी २,०००/—रुपये शासकीय फी चा ऑनलाईन चलनाने भरणा देखील केला होता. त्यानुसार दि.१८.०२.२०२५ रोजी वर नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांचे शेतीची हद्दकायम मोजणी केली होती. परंतु मोजणी केलेल्या हद्दीच्या खुणा निश्चीत करुन दिल्या नव्हत्या. सदरच्या खुणा निश्चीत करुन मोजणी शीट देण्याच्या मोबदल्यात आलोसे यांनी तक्रारदार यांचे ५,५००/—रुपयांची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांनी आलोसे यांना त्यांचेजवळ पैसे नसल्याचे सांगीतले असता आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे ५,५००/—रुपये किंवा शेतात लागवड केलेले हरभऱ्यांची मागणी केले बाबत ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर लाचमागणी तक्रारीची दि.०४.०३.२०२५ रोजी दि.२६.०३.२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांची रावेर तालुक्यातील मस्कावद बुद्रुक गावी असलेल्या गट नंबर ४२२ या शेताची मोजणी करुन, मोजणी केलेल्या हद्दीच्या खुणा निश्चीत करुन, मोजणी शीट देण्याच्या मोबदल्यात पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे प्रथम ५,०००/— रुपये किंवा शेतात लागवड केलेल्या हरभऱ्यांची मागणी करुन, तडजोडीअंती ४,०००/—रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन, सदर लाच रक्कम आज दि.२६.०३.२०२५ रोजी १५.२५ वा.चे सुमारास निंभोरा गावालगत असलेल्या स्मशानभुमी जवळ तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द निंभोरा पोलीस स्टेशन ५४/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.२७.०३.२०२५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.श्रीमती शर्मिष्ठा घारगे—वालावलकर, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.योगेश ठाकूर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.जळगांव हे करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जळगांव तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणीही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील खालील नमुद कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली वा तक्रारीबाबत माहीती पाहीजे असल्यास खालील नमुद दुरध्वनी क्रमांकावर सपंर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या दृष्टीने लाचुलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लॅन्डलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्रि नंबर १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबंधी व करावयाच्या तक्रारी संबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.नं. | युनिटचे नाव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८,२५७८२३० | १०६४ |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | १०६४ |
| ३ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२—२३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४—२३०००९ | १०६४ |

पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव